**<u>ठळक बातम्या</u>**

- राष्ट्रीय जल पुरस्कारांमधे सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्राचा राष्ट्रपतींच्या हस्ते गौरव

- राज्यात विशेष शहरांच्या निर्मितीसाठी प्राधिकरणांच्या जमिनीच्या वापरासाठीच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- वन्य प्राण्यांचे हल्ले आणि धान पीकात पाणी साचण्यालाही प्रधानमंत्री पीकविमा योजनेचं संरक्षण मिळणार

- दिल्ली स्फोट प्रकरणातल्या आरोपीशी संबंध असलेल्या तिघांना मुंबई पोलिसांकडून अटक

**आणि**

- आंध्रप्रदेशात सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली ठार

**<><><><><><>**

नवी दिल्ली इथं आज झालेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय जल पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आले. यात महाराष्ट्राला सर्वोत्कृष्ट राज्य विभागात प्रथम पुरस्कारने गौरवण्यात आलं. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी राष्ट्रपतींच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला. पाण्याचे स्त्रोत कमी असल्यानं पाण्याचा काळजीपूर्वक वापर करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं.

**होल्ड - राष्ट्रपती बाइट**

राज्य सरकारनं राबवलेल्या जलव्यवस्थापन धोरणांचा आणि शेतकरी, पाणी वापर संस्था तसंच प्रत्येक नागरिकाच्या सक्रिय सहभागाचा हा विजय आहे, अशी भावना विखे पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. याशिवाय उत्कृष्ट स्थानिक स्वराज्य

विभागात नवी मुंबई महानगरपालिकेने प्रथम पुरस्कार पटकावला. तर सर्वोत्कृष्ट जलवापरकर्ता संस्था विभागात नाशिक जिल्ह्यातल्या कनिफनाथ जलवापर सहकारी संस्थेला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**<><><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सहावी अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. २०२६-२७ च्या आगामी अर्थसंकल्पाच्या अनुषंगानं त्यांनी या बैठकीत कारखानदारी क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी आणि उद्योजकांशी चर्चा केली. अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरीही या बैठकीला उपस्थित होते. महत्वाच्या धेरणात्मक बाबी, आर्थिक सुधारणा, नवोन्मेषाधारित विकास, गुंतवणुकीच्या संधी आणि आव्हानं इत्यादी मुद्यांवर या बैठकीत व्यापक चर्चा झाल्याचं चौधरी यांनी समाज माध्यमात म्हटलं आहे.

**<><><><><><>**

सिडकोसह राज्यातल्या विविध प्राधिकऱणांकडे असलेल्या जमिनी आणि भूखंडांचा सुयोग्य वापर व्हावा यासाठी संकल्पना आधारित- आयकॉनिक शहर विकासाच्या धोरणाला आज मंत्रिमंडळानं मान्यता दिली. मंत्रीमंडळ निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(राज्यात संकल्पना आधारित एकात्मिक वसाहती किंवा व्यावसायिक क्षेत्राची निर्मिती करणं हे धोरणाचं उद्दिष्ट आहे. त्यानुसार, संबंधित प्राधिकरणाला निविदा प्रक्रियेद्वारे सीडीओ, अर्थात बांधकाम आणि विकास परिचालक नेमता येणार आहे. त्याला विकसनाचे हक्क मिळतील. या सीडीओला निवासी एकात्मिक वसाहत किंवा आंतरराष्ट्रीय व्यावसायिक क्षेत्रांची उभारणी करता येईल, तसंच प्रकल्पातल्या सदनिका आणि व्यवसायिक मालमत्तेची विक्री करता येणार आहे.*

*बृहन्मुंबई उपनगरातल्या वीस एकर किंवा त्यापेक्षा अधिक क्षेत्रफळावर म्हाडाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचा पुनर्विकास करण्याबाबतचं धोरणही निश्चित करण्यात आलं आहे. यातून मुंबई शहर आणि उपनगर क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परवडणारी घरं उपलब्ध होतील. या इमारतींमध्ये आधुनिक सुविधांनी युक्त सदनिका, लिफ्ट, प्रशस्त वाहनतळ, उद्यान, सभागृह, खेळाचे मैदाने, व्यायामशाळा, जलतरण तलाव, सीसीटीव्ही सुविधा यांचा समावेश आहे.)*

**<><><><><><>**

तुकडेबंदी कायद्याचं उल्लंघन करून झालेले जमीन व्यवहार आता निःशुल्क नियमित आणि कायदेशीर करण्यासाठी आवश्यक असणारी कार्यपद्धती महसूल विभागानं निश्चित केली आहे. त्यानुसार, "तुकडेबंदी कायद्याविरुद्ध व्यवहार" हा सातबाऱ्यावरचा शेरा काढून टाकला जाईल, सातबाऱ्यावर नाव लागेल, यापूर्वी खरेदीचा फेरफार रद्द झाला असेल, तर तो पुन्हा तपासून मंजूर केला जाईल आणि खरेदीदाराचं नाव कब्जेदार म्हणून लावलं जाईल, इतर हक्कात नाव असेल तर ते आता मुख्य 'कब्जेदार' सदरात घेतलं जाईल. या निर्णयाचा फायदा राज्यातल्या ६० लाख कुटुंबांना होणार आहे.

**<><><><><><>**

वन्य प्राण्यांचे हल्ले आणि धानाच्या पिकात पाणी साचणं यालाही आता प्रधानमंत्री पीकविमा योजनेचं संरक्षण मिळणार आहे. वन्यप्राण्यांमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीला आता स्थानिक जोखीम म्हणून, तर धानाच्या पिकात पाणी साचून झालेल्या नुकसानीला स्थानिक आणीबाणी म्हणून मान्यता देण्यात आल्याची माहिती कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं दिली. या अनुषंगानं राज्यं, पिकाचं नुकसान करणाऱ्या वन्य प्राण्यांची यादी तयार करतील आणि ऐतिहासिक माहितीच्या आधारे प्रभावित जिल्हे किंवा विमा विभाग निश्चित करतील. नुकसान झाल्यानंतर ७२ तासांच्या आत वीकविमा ॲपवरून शेतकऱ्यांना जिओटॅग असलेल्या फोटोंसह नुकसानीची माहिती द्यावी लागेल. हा निर्णय २०२६च्या खरीप हंगामापासून लागू होणार आहे.

**<><><><><><>**

कुख्यात गुन्हेगार दाऊद इब्राहीमच्या टोळीशी संबंधित मनी लाँडरिंग प्रकरणी माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या विरुद्ध पीएमएलए न्यायालयाने आज आरोप निश्चित केले. मुंबईत कुर्ला इथल्या गोवावाला

कंपाऊंडमधल्या ३ एकर जागेचा ताब अवैधपणे घेतल्या प्रकरणी त्यांच्यावर आरोप ठेवला आहे.

**<><><><><>**

दिल्ली स्फोट प्रकरणातील आरोपीशी संबंधित असलेल्या तिघांना मुंबई पोलिसांनी अटक केली असून त्यांना चौकशीसाठी दिल्लीला पाठवण्यात आलं आहे. अटक केलेले तिघेही समाजमाध्यमाद्वारे आरोपींच्या संपर्कात होते, असं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात सुरक्षा दलांसोबत आज झालेल्या चकमकीत माओवादी कमांडर हिडमा मडावी याच्यासह सहा नक्षली मारले गेले. हिडमा याच्यावर एक कोटी रुपयांचं इनाम होतं. अनेक हिंसक कारवायांमधे हिडमाचा सहभाग असल्याचं पोलिसांनी सांगितलं. ठार झालेल्यांमधे हिडमा मडावीची पत्नी मडकाम राजे हिचाही समावेश आहे. आंध्र प्रदेशामधल्या अल्लुरी सितारामा राजू जिल्ह्यात आज सकाळी सहा ते सातच्या दरम्यान, सुरक्षा दल आणि नक्षलींमधे चकमक झाली. त्यानंतर या परिसरात मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू असल्याचं पोलीस महासंचालक हरिश कुमार गुप्ता यांनी माध्यम प्रतिनिधींना सांगितलं.

**<><><><><>**

बिहारमधे, NDA च्या विधिमंडळ पक्ष नेत्याची निवड करण्यासाठी त्यांच्या नवनिर्वाचित आमदारांची बैठक उद्या पाटण्यात होणार आहे. NDA चे घटक पक्ष असलेल्या भाजपा, संयुक्त जनता दल, लोकजनशक्ती पार्टी-रामविलास, हिंदुस्तानी आवाम मोर्चा, आणि राष्ट्रीय लोकमोर्चा या पाच पक्षांचे एकूण २०२ आमदार या बैठकीला उपस्थित राहतील. निवड झाल्यानंतर विधीमंडळ पक्षनेता राज्यात सत्ता स्थापन करण्यासाठी राज्यपालांकडे धावा करेल.

त्याआधी भाजपा आणि संयुक्त जनता दल यांच्याही विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी स्वतंत्रपणे बैठका होतील. त्याही उद्या होण्याची शक्यता आहे. भाजपा विधीमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी पक्षानं उत्तर प्रदेशाचे उपमुख्यमंत्री केशव प्रकाश मौर्य यांची केंद्रीय निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

<><><><><><>

मतदारयाद्यांचं विशेष सखोल पुनरिक्षण करण्याच्या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरात ५० कोटी ९७ लाखापेक्षा जास्त नोंदणी अर्ज वितरित केले असल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे. पुनरिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात ५१ कोटी मतदारांची पडताळणी होणार असून त्यातल्या ९८ पूर्णांक ५४ शतांश टक्के मतदारांना हे अर्ज मिळाले आहेत. ९ राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेशात हा टप्पा राबवला जात असून उत्तर प्रदेशात १५ कोटी तर पश्चिम बंगालमधे ७ कोटी मतदारांना हे अर्ज दिले आहेत. ४ नोव्हेंबरपासून सुरु झालेला पुनरिक्षणाचा हा टप्पा येत्या ७ फेब्रुवारीपर्यंत चालेल.

<><><><><><>

गाझामध्ये शांतता पुनर्स्थापित करण्याच्या अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रस्तावाला पाठिंबा देणारा ठराव संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेनं मंजूर केला. १५ पैकी १३ सदस्यांनी ठरावाच्या बाजूनं मतदान केलं, रशिया आणि चीन या देशांनी मतदानात भाग घेतला नाही. ट्रम्प यांच्या या प्रस्तावांतर्गत आंतरराष्ट्रीय स्थैर्य दलाची नियुक्ती केली जाईल आणि शस्त्रसंधीच्या दिशेनं पुढची दिशा ठरवण्यात येईल.

<><><><><><>

जागतिक क्रमवारीत अग्रमानांकित टेनिसपटू कार्लोस अल्काराज यानं दुखापतीमुळं डेव्हिस कपच्या अंतिम फेरीतून माघार घेतली आहे. आज त्यानं

समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. नुकत्याच झालेल्या एटीपी फायनल्स स्पर्धेवेळी त्याच्या दुखापतीनं आणखी गंभीर स्वरूप धारण केलं. या स्पर्धेत यानिक सिनर यानं त्याचा पराभव केला होता.

**//<><><><><><>//**